१०

# व्हाईट टायगर

प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे,
सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल.

'द व्हाईट टायगर' म्हणाल तर कांदबरी, म्हणाल तर आत्मचरित्र! भारत देशातील एका छोटया खेडयातील छोटया मुलाची ही आत्मकथा! ज्या मुलाचे नाव ठेवायला सुध्दा त्याच्या आई- वडीलांना वेळ नाही, असा मुन्ना! असे असले तरी मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. आणि त्यामुळेच त्याच्या आईने ओळखले होते की हा मुलगा शिकणार तसे तिने आपल्या रिक्षा ओढणा-या नव-याला सांगितले. विक्रम हलवाई! त्यानंतर शाळेमध्ये गेल्यावर कृष्णा नावाच्या शिक्षकाने त्याचे नामकरण केले आणि ते म्हणजे बलराम होय! त्यानंतर त्याला 'व्हाईट टायगर' म्हणून एका शिक्षण अधिका-याने संबोधले आणि त्याला खरोखरच्या चांगल्या श्शाळेमध्ये घालण्याचे वचन दिले. परंतू सावकाराच्या कर्जामुळे त्याला चहाच्या टपरीवर काम करावे लागले. तिथे काम करताना मालकाच्या हातुन चहा ढवळण्याचे गरम गरम भांडे त्याने डोक्यावर खाल्ले आहे, त्याचबरोबर त्या भांडयासोबत उडालेल्या गरम गरम चहाचे चटके त्याच्या कानशिलावर बसुन ते अजुनही गुलाबी रंगाचे त्याच्या कानावर दिसतात.

स्वाभिमानाने जगता यावे म्हणून त्याने ड्रायव्हिंग शिकण्याचे ठरविले. ड्रायव्हिंग शिकविणारा म्हातारा गिअर चुकला की डोक्यामध्ये एक फटका मारायचा आणि तू चहा कर मिठाई बनव कारण हलवायाचा मुलगा! परंतु तरी तो जिद्दीने शेवटी ड्रायव्हिंगचे काम करतो.

भारतामध्ये जर गाडीचा/कारचा ड्राईव्हर म्हणून नियुक्ती झाली असली तरी जेव्हा त्याला गाडी चालविण्याचे काम नसेल तेव्हा त्याला खाली ठेवत नाहीत. तर घरातील सर्व काम स्वयंपाकापासुन तर कुत्र्यांची आंघोळ घालण्यापर्यंत, त्यांची मुले सांभाळण्यापर्यंत, त्यांचे पाय चेपणे अशी सर्वच काम करावी लागतात आणि वरून डोक्यावर फटकेही खावे लागतात. त्यानंतर हा ड्राईव्हर मालकासोबत दिल्लीला जातो. दिल्लीमध्ये ड्रायव्हरकी करणेही काही सोपे काम नाही, दिल्लीचे सर्व ड्राईव्हर त्याला 'गावठी उंदीरा' म्हणूनच बोलतात.



Vol: 3rd , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st SEP. 2014,ISSN : 2319-5525

असा हा ड्राईव्हर मालकाची मनोभावे  सेवा करतो. परंतू अशा घटना घडतात की तो शेवटी त्याचा खून करतो आणि त्याचे ७ लाख रूपये घेऊन बंगळूर शहरामध्ये जाऊन त्याच्या तेरा पट बनवून व्यवसाय सुरू करतो आणि मालकाच्या पैशाबरोबरच त्याचे नाव सुध्दा घेतो आणि बनतो मोठा उद्योजक मि. अशोक शर्मा !

हे पुस्तक वाचतांना आपल्या डोक्यासमोर 'क्षितीज' आणि समांतर असलेले 'रेल्वेचे रूळ' येतात की जे दुरून बघितल्यावर एकमेकांसोबत जुळलेले दिसतात परंतु वास्तविकेत ते कधीच जुळत नाही. पुस्तकामध्ये तुलना केलेली आढळते.

भारतातील खेडे- विजेचे खांब न चालणारे, पाण्याचे नळ मोडलेले, डॉक्टर नसलेले दवाखाने वैगेरे आणि त्याच वेळेस दुसरीकडे आपण दिल्ली, बंगळूर शहराची चर्चा करतो.

भावाच्या मुलाची बंगळूर येथील शाळा आणि त्याची शाळा यांची तुलना करतो मुन्नाच्या शाळेमध्ये शिक्षकाने वर्गाच्या चार पैकी तीन भिंती पान खाऊन त्यावर थुंकुन रंगुन टाकलेल्या आहेत. आजही शिक्षकांमध्ये माणुसकी जीवंत आहे हे दाखविण्यासाठी त्याने एक भिंत तशीच सोडून दिलेली आहे त्याचे कारणही त्याने सांगितलेले आहे आणि ते म्हणजे चौथ्या भिंतीवर असलेला भगवान गौतम बुध्दाचा फोटो! शिक्षकाचा पगार ६ महिने न झाल्यामुळे शासनाकडून मिळणा-या मुलांच्या जेवणाचे आणि शाळेच्या गणवेषाचे पैसे शिक्षकाच्या घशामध्ये गेलेले आहेत. वर्गामध्ये खडू नाही, फळा नाही अशी व्यवस्था वर्गाची आहे. ही शाळा खेडयातील सर्व शाळेंचे प्रतिनिधित्त्व करते आणि शिक्षक खेडयांतील शिक्षकांचे!

सावकारांची, जमीनदारांची मुलं अमेरिकेमध्ये शिकायला जातात, तेथील मुलीशी लग्न करून तिला भारतामध्ये आणतात. आणि त्याच्या शिक्षणाचा फायदा भारताला काय?तर दिल्लीमध्ये राहावयाचे, दर तिस-या/चौथ्या दिवशी वेगवेगळया ए.टी.एम मधून लाखो रूपये काढावयाचे, ते पैसे गावातील कोळसा सरकारच्या बिन परवानगीने काढून विकल्याबदल आणि राजकारणामध्ये पार्टी निवडून येण्यासाठी मंत्र्याच्या घरी ते लाखो रूपये पोहचावयाचे. परदेशामध्ये शिक्षण घेऊन काय फायदा?

त्यानंतर आपल्या डोळयासमोर अमरिकेतील मि. अशोक यांनी ख्रिश्चन मुलगी पिंकी मॅडम आणि मुन्नाच्या घरातील असलेल्या स्त्रिया डोळयासमोर येतात. पिंकी मॅडम फक्त मेकअप करते, खरेदी करते आणि आराम करते एवढेच काम! तर खेडयातील स्त्रियांचा दिवस उजाडल्यापासून तर रात्र होईपर्यंत त्यांचा हात रिकामा नसतो. त्यांची आपापसात नेहमी-नेहमी भांडण होतात ती वेगळीच. तरीही त्या नव-याच्या नव-याच्या घरातच मरतात. (मुन्नाची आई) मात्र पिंकी मॅडम अमेरिकेमध्ये नव-याला सोडून चालल्या जातात.

सवकाराचे बंगले बाथरूम सोडून त्यांच्या सर्व खोल्यांमध्ये मोठ मोठे झुंबर लावलेली आहेत आणि मुन्नाच्या घरामध्ये एकीकडे माणसांना तर एका खोलीमध्ये सर्व बायका व सर्व मुले झोपतात कुणाचा हात, कुणाचा पाय कुणाच्या अंगावर!

भारतामध्ये एकीकडे धर्माचा एवढा उदो-उदो केला जातो, आणि एकीकडे एका मुसलमान व्यक्तिला नाव बदलून 'रामप्रसाद',धर्म बदलुन साधी ड्रायव्हरची नोकरी टिकविण्यासाठी करावा लागतो.

गंगा नदीला आपण किती पवित्र मानतो, परंतु तिच खंर रूप किती भयंकर आहे हे पाणी प्रदुषणावरून आपण समजू शकतो. ते रूप मुन्नाने या पुस्तकामध्ये कोरलेले आहे. आजही खेडयातील सावकार काय करतो? नदीमध्ये मासे पकडणा-या कोळयाकडून पैसे घेतो. रस्त्यावरून रिक्षा चालविणा-याकडून पैसे घेतो. मजुरी कमी देणे. त्याचप्रमाणे लग्नासाठी, मरणासाठी कर्ज देतो आणि अर्थातच ते कर्ज फिटूच शकत नाही म्हणून मग त्या घरातील सर्व लहान मोठयांनी सावकारासाठीच फक्त काम करणे आवश्यक असते बायांसाठी सुध्दा तेच आणि आणखी काय काय....... एवढे कमी म्हणून की काय त्या लोकांच्या सर्वांगावर जाळल्याचे, मारल्याचे डाग दिसतात. म्हणजे जिथपर्यंत नजर जाईज तिथपर्यंत!

पिंकी मॅडममुळे जेव्हा हिरव्या रंगाच्या कापडाचा तुकडा गाडीच्या खालच्या बाजुला चिकटलेला दिसतो आणि जेव्हा व्हाईट टायगरला सांगीतले जाते की जर अपघाताची चौकशी झाली तर तु तुरूंगात जाशील आणि नवल म्हणजे त्याची आजी बरेचसे पैसे घेऊन हे पाप करायला तयार असेत तेव्हा आपल्याला असे वाटते की, नको याला तुरूंग नको व्हायला! आणि जेव्हा त्याला तुरूंगवास होत नाही तेव्हा कुठे तरी आपल्याला त्या हिरव्या रंगाच्या कापडाची आठवण होते आणि आपल्या मनासमोर प्रश्न पडतो अरे! खरंच कोण असेल बरं छोटा मुलगा की मुलगी......... ?बरं मग ज्याचा मुलगा/मुलगी बेपत्ता झाली आहे असे पालक काय करत असतील ?आपल्यासामोर प्रश्न उभा राहतो. त्याचबरोबर दुसराही प्रश्न उभा राहतो आणि तो म्हणजे अशा प्रकारच्या झोपडीतील लोकांचे जीवन किती क्षणभंगूर आहे. आले काय?गेले काय?काही पर्वा ?

लेखक आपल्या मालकाचा खून करतो, त्यानंतर काही दिवसांनी वर्तमानपत्रामध्ये बातमी येते. 'एकाच कुटुंबातील १५लोकांची हत्या'? तेव्हा सुध्दा आपल्याला प्रश्न पडतो की एका जमीनदार माणसाच्या मरणाच्या बदल्यात संपूर्ण कुटुंब उद्‌धस्त !

अशी जरी परिस्थिती विशद केली असली तरी एखादी व्यक्ती ती परिस्थिली बदलू शकते हे सुध्दा लेखकाने विजय नावाचे पात्र घेउन दाखविले आहे. तो खालच्या जातीमध्ये जन्माला जरी आला असला तरी तो एक दिवस मोठा राजकारणी बनतो आणि सावकारांना त्याच्या गाडीमधून त्याला न्यायला भाग पाडतो विजय हा मुन्नाचा आदर्श आहे.



Vol: 3rd , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st SEP. 2014,ISSN : 2319-5525

मि. अशोक शर्मा एक खूनी जरी असला तरी त्याचे मन अगदी संवेदनशील आहे. बंगळूरमध्ये जेव्हा त्याच्या १३ ड्रायव्हर पैकी एका ड्रायव्हरच्या चुकीने एका तरूण मुलाचा जीव जातो. मि. अशोक पोलीसांची तर बोलती बंद करतातच परंतु तरीही २५,०००रू त्याच्या आईवडीलांना देतात आणि त्याच्या लहान भावाला नोकरी पण द्यायला तयार होतात.

पुस्तकाचे नाव यथार्थ आहे ' व्हाईट टायगर ' होय. 'पांढरा वाघ' कारण की हा वाघ फक्त बंगालमध्ये आढळतो - आणि ब-याच वर्षानंतर पिवळया रंगाच्या वाघाच्या पोटी पांढरा वाघ जन्माला येणे म्हणजे संपूर्ण परिस्थिती बदलणे -

शेवटी एवढचं म्हणावसं वाटतं की,
''मिटूनी जावो भेद श्रीमंती गरीबीतला,
समानता भूषण ठरो भारताला,
कोण कधी अवतरेल या भूवर?
जसा जन्मतो दशकांनी व्हाईट टायगर!'

...

## Sanshodhan Chetana
### Membership Form

Name : ____________________

Designation : ____________________

Residential Address : ____________________
____________________
____________________

Name & Address of the Institution : ____________________
____________________
____________________

Phone No. : ____________________

E_mail : ____________________

Mob. : ____________________

Signature



Vol: 3rd , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st SEP. 2014,ISSN : 2319-5525